27 JUN 2025 पुढारी
जनसपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यकर्त्यांनी माणुसकी, शाहूंचे विचार समजून घ्यावेत : डॉ. जब्बार पटेल

## राजर्षी शाहू पुरस्कार प्रदान



कोल्हापूर : ज्येष्ठ नाट्य - चित्रपट दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांना शाहू पुरस्कार प्रदान करताना खासदार शाहू महाराज, पालकमंत्री प्रकाश आबिटकर. शेजारी जिल्हाधिकारी अमोल येडगे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जिल्हा पोलिस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., डॉ. अशोक चौसाळकर, रोहित तोंदले, डॉ. जयसिंगराव पवार, मोहिनी चव्हाण, राजदीप सुर्वे आदी. (छाया : मिलन मकानदार)

कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा

स्वातंत्र्यपूर्व राजेशाहीतसुद्धा राजर्षी छत्रपती शाहू महाराजांनी अनेकांचा विरोध झुगारून लोकशाही मूल्यांची जपणूक केली. त्यांच्या विचारधारेत भारतीय व पाश्चात्त्य संस्कृतीचा सुरेख संगम दिसतो. बाबासाहेब आंबेडकर यांनी संविधानात समतेच्या माध्यमातून शाहूंचे विचार उतरवले. आजचे अधिकारी आणि राज्यकर्त्यांनी समाजातील तळागाळातील प्रश्न सोडवायचे असतील, तर त्यांना माणुसकी आणि शाहूंचे विचार समजून घेणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ नाट्य व चित्रपट दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी केले.

राजर्षी शाहू जयंतीचे औचित्य साधून शाहू स्मारक भवनात गुरुवारी आयोजित कार्यक्रमात खासदार शाहू महाराज व पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते डॉ. पटेल यांना 'राजर्षी शाहू पुरस्कार' प्रदान करण्यात आला. पुरस्काराचे स्वरूप सन्मानचिन्ह, शाल, श्रीफळ व एक लाख रुपये असे होते.

यावेळी जिल्हाधिकारी अमोल येडगे, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., जिल्हा पोलिस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता, इतिहास संशोधक जयसिंगराव पवार, रोहित तोंदले आदी मान्यवर उपस्थित होते.

**हा पुरस्कार वेगळा वाटतो...**

आजवर अनेक पुरस्कार मिळाले, पण हा पुरस्कार मनाला स्पर्शून गेला आहे, असे सांगत डॉ. पटेल म्हणाले, शाहू महाराजांनी लोकशाही नसतानाही मानवी मूल्ये जपली. पान ४ वर ▸

27 JUN 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राज्यकर्त्यांनी माणुसकी, शाहूंचे विचार समजून घ्यावेत : डॉ. जब्बार पटेल

(पान १ वरून)

त्यांनी केवळ सत्ता गाजवली नाही, तर समाजाच्या तळागाळातील लोकांशी नाते जोडले. ५० टक्के आरक्षणाचा कायदा करून त्यांनी विशेष पुढाकाराने ऐतिहासिक निर्णय घेतला. प्रत्येक समाजासाठी वसतिगृहे निर्माण केली. शाहूंनी जात-धर्माचे [illegible] तोडतील, सामान्य माणसासाठी त्यांनी सामाजिक कामे केली ती आजही समाजात प्रतिबिंबित आहेत. त्याचबरोबर अनेक सुविधा त्यांनी कोल्हापुरात केल्या.

**आरक्षणाची महत्त्वाची फाईल आणि वाघाचं पिल्लू...**

यावेळी डॉ. पटेल यांनी राजर्षी शाहूंविषयी एक किस्सा सांगत सभागृहात हशा पिकवला. शाहू महाराजांनी आरक्षणाचा निर्णय घेतला होता. पण त्याच विशेष [illegible] फाईल गहाळ झाली. त्यांनी एका पंत नावाच्या अधिकाऱ्याला चहासाठी बोलावले. दरम्यान, शेजारील एक वाघाचे पिल्लू त्या अधिकाऱ्याजवळ गेले. अधिकाऱ्याला वाटले, मांजराचे पिल्लू असेल. [illegible] शाहू महाराज यांनी हे वाघाचे पिल्लू आहे, असे सांगत आत निघून गेले. यामुळे अधिकारी पंत यांना घाबरून घाम फुटला. शाहू महाराजांनी हे आतून पाहिले. नंतर ते बाहेर आले आणि 'आपण कुठल्या विषयावर बोलत होतो?' असे पंतांना विचारले. पंत म्हणाले, 'महाराज, आरक्षणाच्या फाईलवर सही झाली!' आजही काम करून घ्यायचे असेल तर वाघाची पिल्लं बाळगावी लागतील, असे सांगत त्यांनी राज्यकर्त्यांवरही मिश्कील टोला लगावला.

**पुरस्काराची रक्कम समाजकार्यासाठी समर्पित**

डॉ. पटेल यांनी पुरस्काराची एक लाख रुपयांची रक्कम प्रकाश आमटे यांच्या 'आनंदवन' व डॉ. नरेंद्र दाभोलकर यांच्या 'अंधश्रद्धा निर्मूलन समिती'ला प्रत्येकी ५० हजार रुपये अशी देणगी म्हणून जाहीर केली.

डॉ. अशोक चौसाळकर यांनी डॉ. पटेल यांचा परिचय करून देऊन सूत्रसंचालन केले. जिल्हा पुरवठा अधिकारी मोहिनी चव्हाण यांनी स्वागत केले तर प्रशासन अधिकारी राजदीप सुर्वे यांनी आभार मानले.

**कोल्हापूरच्या आठवणी आणि म्हादबांचे पान...**

कोल्हापूरसोबतच्या जुन्या आठवणींनाही डॉ. पटेल यांनी उजाळा दिला. [illegible] पहिल्या सिनेमाचे शूटिंग कोल्हापुरात झाले. म्हादबा मेस्त्री यांनी [illegible] 'डॉक्टर, तू नव्या पद्धतीने सिनेमा करतोस, [illegible] कर', असा प्रेमळ सल्ला दिला. त्यांनी जुना, [illegible] पान दिले. मी पान खात नाही म्हटल्यावर म्हणाले, 'कोल्हापूर आहे, खावेच लागेल.' कोल्हापूरचे हे प्रेम मी कधी विसरणार नाही, असे त्यांनी भावुक होत सांगितले.



कोल्हापूर : पुरस्कार सोहळ्यासाठी उपस्थित शाहूप्रेमी. (छाया : मिलन मकानदार)




कोल्हापूर : येथील राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टतर्फे गुरुवारी खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते प्रसिद्ध दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांना राजर्षी शाहू पुरस्काराने गौरवण्यात आले. यावेळी (डावीकडून) रोहित तोंदले, डॉ. अशोक चौसाळकर, कार्तिकियन एस., योगेशकुमार गुप्ता, अमोल येडगे, प्रकाश आबिटकर, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जयसिंगराव पवार, मोहिनी चव्हाण, राजदीप सुर्वे. (बी. डी. चेचर : सकाळ छायाचित्रसेवा)

# संविधान सांभाळण्यासाठी शाहू विचार गरजेचा : जब्बार पटेल

## दिमाखदार सोहळ्यात राजर्षी शाहू पुरस्काराने सन्मान

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर देशाच्या संविधानाचे शिल्पकार असले, तरी लोकशाहीपूर्वी राजर्षी शाहूंनी करवीर संस्थानात संविधानाची बीजं रोवली होती. येत्या काळातही देशाचे संविधान सांभाळण्यासाठी राजर्षी शाहूंचा समतेचा विचार गरजेचा असल्याचे स्पष्ट मत प्रसिद्ध दिग्दर्शक डॉ. जब्बार पटेल यांनी आज येथे व्यक्त केले.

राजर्षी शाहू जयंतीदिनी येथील राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टतर्फे डॉ. जब्बार पटेल यांना राजर्षी शाहू पुरस्काराने गौरवण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज यांच्या हस्ते पुरस्कार देण्यात आला. पालकमंत्री प्रकाश आबिटकर अध्यक्षस्थानी होते. दरम्यान, राजर्षी शाहू स्मारक भवनात हाउसफुल्ल गर्दीच्या साक्षीने हा सोहळा सजला.

राजर्षी शाहूंच्या जीवनातील विविध पैलू उलगडत डॉ. पटेल यांनी आपल्या खास शैलीत सुमारे पाऊणतास संवाद साधला. ते म्हणाले, "आजवर अनेक पुरस्कार मिळाले; पण राजर्षी शाहूंच्या नावाने मिळालेला हा पुरस्कार वेगळी ऊर्मी देणारा आहे. कारण देशात

पान ११ वर ➜

### राजर्षी शाहू स्मारक नूतनीकरणासाठी ५ कोटी

■ राजर्षी शाहू स्मारक भवनाची लोकसहभागातून कोल्हापूरकरांनी उभारणी केली. यंदा या स्मारकाचे नूतनीकरण करण्याचा निर्णय घेतला असून, लोकसहभागातून निधी उभारला जाणार असल्याचे ट्रस्टचे अध्यक्ष, जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी प्रास्ताविकात सांगितले. त्यावर पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी पाच कोटी रुपयांच्या निधीची घोषणा केली.

### पुरस्काराची रक्कम दोन संस्थांना

■ एक लाख रुपये, सन्मानचिन्ह व मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप होते. पुरस्काराची रक्कम प्रकाश आमटे यांच्या 'आनंदवन' या संस्थेसह अंधश्रद्धा निर्मूलन समितीला देणार असल्याचे यावेळी डॉ. पटेल यांनी सांगितले. याबाबतची घोषणा जिल्हाधिकारी येडगे यांनी केली.

27 JUN 2025

सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# संविधान सांभाळण्यासाठी शाहू विचार गरजेचा : डॉ. जब्बार पटेल


> पान १ वरून

लोकशाही अस्तित्वात नसतानाही त्याच्याही पुढची मूल्ये जपत राजर्षींनी अनेक समाजसुधारणा केल्या. त्यासाठीचे कायदे व नियम केले आणि त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी केली. गंगाराम कांबळे यांच्यासारख्या दलित माणसाला हॉटेल काढून तेथे स्वतः चहा घेणारा हा राजा म्हणजे सत्तेतून तळागाळातील माणसाशी कशी नाळ जोडावी, याचा आदर्श आहे. धर्म, जाती, भाषा या साऱ्या पलकीडे जाऊन त्यांनी सांस्कृतिक मूल्ये रुजवली."

हल्ली प्रत्येक खात्याला वेगळे मंत्री असतात; पण राजर्षी शाहू म्हणजे एक 'कॅबिनेट' होते. त्यांनी बालविवाहापासून ते आरोग्य सेवेपर्यंत अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. संगीतातील जयपूर घराणे कोल्हापुरात आणले. फासेपारध्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले. मुळात राज्यकर्त्याला अगोदर माणुसकी समजावी लागते. राजर्षी शाहूंकडे ती होती म्हणूनच त्यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. जे आजही राज्यकर्त्यांबरोबरच शासकीय अधिकाऱ्यांसाठीही प्रेरणादायी ठरतात. माणुसकी जपत देवाच्याही पलीकडे गेलेले राजर्षी शाहू हे खऱ्या अर्थाने लोकराजा होते, असेही डॉ. पटेल म्हणाले. खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज म्हणाले, "राजर्षी शाहूंच्या प्रेरणेतूनच डॉ. जब्बार पटेल यांनी चित्रपट, नाटकातून महाराष्ट्राला वेगळी दिशा दिली. शाहूंचा समतेचा विचार समाजात रुजवण्यात त्यांचे योगदान मोठे आहे. शाहूंच्या विचारावर आजही राज्य आणि देश चालतो. 'घाशीराम कोतवाल'सारख्या कलाकृती पुन्हा रंगमंचावर यायला हव्यात."

पालकमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, "समाजातील विविध प्रश्नांबाबत राजर्षी शाहू महाराज अस्वस्थ असायचे आणि त्यातूनच त्यांनी अनेक क्रांतिकारी निर्णय घेतले. आजच्या राजकारण्यांनीही असे अस्वस्थ असायला हवे. तरच त्यांच्याकडून जनतेला योग्य तो न्याय मिळेल."

ट्रस्टचे अध्यक्ष, जिल्हाधिकारी अमोल येडगे यांनी प्रास्ताविक केले. डॉ. अशोक चौसाळकर यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. ट्रस्टच्या सचिव मोहिनी चव्हाण यांनी मानपत्राचे वाचन केले. प्रशासनाधिकारी राजदीप सुर्वे यांनी आभार मानले. पंडित कंदले यांनी सूत्रसंचालन केले. ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, जिल्हा पोलिस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकेयन एस., सार्वजनिक बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता रोहित तोंदले आदी उपस्थित होते. शाहीर विशारद आझाद नायकवडी यांच्या शाहू गौरव गीताने कार्यक्रमाला प्रारंभ झाला.



कार्यक्रमाला राजर्षी शाहू स्मारक भवनात झालेली हाउसफुल्ल गर्दी.

## राजर्षी शाहूंवर चित्रपट व्हावा...

■ डॉ. पटेल यांनी अनेक अजरामर कलाकृती निर्माण केल्या. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या कार्यावर चित्रपट केला. सध्या ते महात्मा जोतिबा फुले यांच्यावर चित्रपट करत असून, येत्या काळात राजर्षी शाहूंच्या जीवनकार्यावरही त्यांनी चित्रपट करावा, अशा भावना यावेळी व्यक्त झाल्या.

## फाईलवर सही झाली महाराज...

■ डॉ. पटेल यांनी राजर्षी शाहू यांच्याबाबतची एक दंतकथा ऐकली असल्याचे सांगितले. आरक्षणाचा कायदा अमलात आणण्यासाठी वाघाच्या बछड्याला समोर बसवून अधिकाऱ्याला त्यांनी कामाला लावले आणि अखेर त्या अधिकाऱ्याने भयभीत होऊन 'फाईलवर सही झाली महाराज'' असे सांगितले. ही कथा प्रतीकात्मक आहे. मुळात राज्यकर्ते असोत किंवा अधिकारी त्यांनी फाईलमध्ये आवक-जावक क्रमांकापेक्षा मदतीच्या अपेक्षेत असणाऱ्या माणसांचे चेहरे पाहिले, तर नक्कीच सर्वसामान्यांना योग्य वेळी न्याय मिळेल, हा शाहू विचार या कथेतून आपल्याला मिळतो, असे डॉ. पटेल म्हणाले.

## चित्रपटाचे 'कोल्हापूर स्कूल'

■ चित्रपटाचे 'कोल्हापूर स्कूल' ही कोल्हापूरची ओळख आहे. येथे पहिला चित्रपट करायला मिळाला. त्याच्या मुहूर्तवेळी चित्रतपस्वी भालजी पेंढारकर, लता मंगेशकर, चंद्रकांत मांडरे अशी दिग्गज मंडळी उपस्थित होती. चित्रपटातील सर्व प्रकारची समज असणारी तंत्रज्ञ मंडळी येथे होती. अनेक दिग्गजांनी येथील चित्रपटसृष्टीसाठी योगदान दिल्याच्या आठवणीही डॉ. पटेल यांनी सांगितल्या.

27 JUN 2025 सकाळ
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर


# शाहूंचा जयजयकार, दुमदुमले शहर

## लक्ष्मी विलास पॅलेसमध्ये अभिवादनासाठी गर्दी

■ सकाळ वृत्तसेवा

कोल्हापूर, ता. २६ : लोकराजा, समतेचे पुरस्कर्ते राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त त्यांच्या जयजयकाराने शहर परिसर आज दुमदुमला. प्रतिमा पूजन, व्याख्याने, प्रभात फेऱ्यांतून शाहूंच्या कार्याला सलाम करण्यात आला. कसबा बावड्यातील लक्ष्मी विलास पॅलेस येथे त्यांच्या जन्मस्थळी दिवसभर शाहूप्रेमींची गर्दी राहिली. दसरा चौकातील शाहूराजांच्या पुतळ्याला विविध पक्ष, संस्था-संघटनांकडून अभिवादन करण्यात आले.

पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते लक्ष्मी विलास पॅलेसमधील शाहूराजांच्या प्रतिमेचे पूजन झाले. या वेळी वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज, आमदार सतेज पाटील, आमदार प्रा. जयंत आसगावकर, माजी आमदार ऋतुराज पाटील, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, आयुक्त के. मंजुलक्ष्मी, मुख्य कार्यकारी अधिकारी कार्तिकियन एस., पोलिस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता, ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, वसंतराव मुळीक, इंद्रजित सावंत उपस्थित होते.



कोल्हापूर : लोकनेते राजर्षी शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित त्यांच्या जन्मस्थळी कसबा बावड्यातील लक्ष्मी विलास पॅलेसमध्ये त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करताना खासदार श्रीमंत शाहू छत्रपती महाराज. शेजारी प्रकाश आबिटकर, हसन मुश्रीफ, डॉ. पी. एस. पाटील, माणिक पाटील-चुयेकर, डॉ. डी. टी. शिर्के, ऋतुराज पाटील, जयंत आसगावकर, के. मंजुलक्ष्मी, योगेशकुमार गुप्ता, अमोल येडगे, सतेज पाटील, विजय देवणे, वसंतराव मुळीक, डॉ. जयसिंगराव पवार, लालासाहेब गायकवाड, इंद्रजित सावंत. (नितीन जाधव : सकाळ छायाचित्रसेवा)


**होलोग्राफिक शोचे लोकार्पण...**

लक्ष्मी विलास पॅलेसमध्ये होलोग्राफिक शोचे लोकार्पण केले. यात शाहू राजांच्या जीवन काळातील निवडक व महत्त्वाची भाषणे आहेत. त्यांचे सादरीकरण आधुनिक होलोग्राफिक तंत्रज्ञानाचा वापर करून केले आहे. शोमध्ये वापरलेले पेहराव त्या काळातील मूळ वेशभूषेच्या आधारे तयार केले आहेत. दिग्दर्शन किरणसिंह चव्हाण यांनी केले आहे. इंद्रजित सावंत यांनी ऐतिहासिक संशोधन, लेखन आणि शाहू महाराजांच्या भाषणांचे संकलन केले आहे. या शोसाठी दीड कोटींचा खर्च केला आहे. एकावेळी ३० प्रेक्षक बसून हा अनुभव घेऊ शकतात. हा शो १५ मिनिटांचा आहे. दिवसातून अनेक वेळा त्याचे सत्र आयोजित केले जातील.

27 JUN 2025

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर



कसबा बावडा : राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांना १५१ व्या जयंतीनिमित्त कसबा बावड्यातील शाहू जन्मस्थळी अभिवादन करण्यात आले. यावेळी प्रकाश आबिटकर, हसन मुश्रीफ, शाहू महाराज छत्रपती, सतेज पाटील, अमोल येडगे, डॉ. डी. टी. शिर्के, के. मंजूलक्ष्मी, कार्तिकेयन एस., योगेशकुमार गुप्ता, जयसिंगराव पवार आदी.

# रयतेच्या राजाला अभिवादन

## राजर्षी शाहू महाराजांचे कार्य प्रेरणादायी : पालकमंत्री आबिटकर, मंत्री मुश्रीफ

**प्रतिनिधी**
कोल्हापूर

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त कसबा बावड्यातील जन्मस्थळी मान्यवरांकडून अभिवादन करण्यात आले. यावेळी शाहू महाराजांच्या जीवनावर आधारित लघुपटाच्या सादरीकरणासाठी उभारण्यात आलेल्या ३० आसनी थिएटरचे लोकार्पण मान्यवरांच्या हस्ते पार पडले.

राजर्षी शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त कसबा बावड्यातील शाहू जन्मस्थळी अभिवादनप्रसंगी पालकमंत्री प्रकाश आबिटकर, वैद्यकीय शिक्षण मंत्री हसन मुश्रीफ, खासदार शाहू महाराज छत्रपती, आमदार सतेज पाटील, आमदार जयंत आसगावकर, ऋतुराज पाटील, जिल्हाधिकारी अमोल येडगे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, महापालिका प्रशासक के. मंजूलक्ष्मी, जि. प. चे सीईओ कार्तिकेयन एस., जिल्हा पोलीस अधीक्षक योगेशकुमार गुप्ता, ज्येष्ठ इतिहास संशोधक जयसिंगराव पवार, इंद्रजीत सावंत, वसंतराव मुळीक आदी उपस्थित होते.

पालकमंत्री प्रकाश आबिटकर म्हणाले, लोककल्याणकारी राजा आणि समतेच्या विचारांचे पुरस्कर्ते म्हणून राजर्षी शाहू महाराजांचे कार्य नेहमीच प्रेरणादायी राहिले आहे. संपूर्ण देशाला आदर्श असणारे राजर्षी शाहू महाराज आम्हाला




प्रेरणास्थान आहेत. राजर्षी शाहूंचे कार्य देशभर पोहोचावे यासाठी आपण सर्वजण प्रयत्नशील राहू. मंत्री हसन मुश्रीफ यांनी छत्रपती शिवाजी महाराज आणि राजर्षी शाहू महाराज यांनी रयतेसाठी काम केले. त्यासाठी स्वतःचा खजिना रिकामा केला. त्यांनी सर्व जातीधर्मांच्या लोकांना एकत्र करून समतेचे राज्य निर्माण केले. म्हणून हे दोन्ही राजे आम्हाला आदर्श असल्याचे सांगितले.

खासदार शाहू छत्रपती म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांनी समाजातील वंचित आणि दुर्बल घटकांना न्याय मिळवून देण्यासाठी अथक प्रयत्न केले. शिक्षण सर्वांसाठी खुले केले. आरक्षणाची मुहूर्तमेढ रोवली आणि जातीभेद निर्मूलनासाठी महत्त्वपूर्ण पावले उचलली. त्यांचे विचार आणि कार्य आजही समाजाला दिशा देत आहे. यावेळी शाहू जन्मस्थळी विविध मान्यवरांसह शासकीय अधिकारी, कर्मचारी, नागरिक, विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते.

▸ शाहूंच्या माणुसकीच्या विचारांचे अनुकरण करावे पान ३

### सतेज पाटील अन् मुश्रीफांची टोलेबाजी

राजर्षी शाहूंना अभिवादन केल्यानंतर बाहेर पडताना सतेज पाटील हे हसन मुश्रीफ यांना म्हणाले, हॉलकडे चला. यावर मुश्रीफ म्हणाले बावड्यापुरते ऐकायला पाहिजे. तर यावर सतेज पाटील यांनी शाहू महाराजांचा जन्म बावड्याचा आहे. यानंतर हॉलमध्येही जन्मस्थळ प्रवेशद्वारावरून दोघांच्यात मिश्कीलपणे टोलेबाजी चालू होती.

### युवा संघटकासाठी खुर्ची राखीव

शाहू जन्मस्थळी उभारलेल्या ३० आसनी थिएटरचा लोकार्पण सोहळा पार पडला. यावेळी लोकप्रतिनिधींसह शासकीय अधिकारी यांची बैठक व्यवस्था मागे केली होती. तर युवा संघटक कृष्णराज महाडिक याचे नाव असणारी खुर्ची पहिल्या लाईनमध्ये होती. यावेळी खुर्चीवरील नाव पाहून सर्वजण अचंबित झाले होते. दरम्यान, दोन दिवसांपूर्वी झालेल्या जिल्हा नियोजनच्या बैठकीतही पत्रकार बाहेर आणि वीरेंद्र मंडलिक व कृष्णराज महाडिक हे दोन युवा नेते आत होते. याचीही चर्चा रंगली होती.

1 7 JUN 2025

पुण्यनगरी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहू महाराजांच्या विचारांची प्रेरणा घेऊ : प

## कसबा बावडा येथील जन्मस्थळी राजर्षींना अभिवादन; कोल्हापूरन

कोल्हापूर : प्रतिनिधी

कोल्हापूरचा स्वाभिमान, आपल्या सर्वांचा अभिमान व प्रेरणास्थान असलेल्या राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त त्यांना अभिवादन करत, त्यांच्या विचारांची व कामांची प्रेरणा घेऊन कोल्हापूरचे नाव अधिक उज्ज्वल करूया, असे प्रतिपादन सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याणमंत्री तथा पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केले. राजर्षी शाहू महाराज यांच्या जन्मस्थळी त्यांच्या जयंतीनिमित्त झालेल्या कार्यक्रमात ते बोलत होते.

ते म्हणाले, राजर्षी शाहू जन्मस्थळाच्या विकासासाठी तत्कालीन पालकमंत्री सतेज पाटील आणि मंत्री हसन मुश्रीफ यांनीही योगदान दिले आहे. यापुढेही सर्व जण मिळून जन्मस्थळ विकासासाठी कार्य करू. येत्या काळात अधिवेशन झाल्यावर एक बैठक घेऊन सर्व संघटना, समित्यांच्या सूचना आणि म्हणणे विचारात घेऊन कामांची दिशा ठरवली जाईल, अशी ग्वाही त्यांनी दिली.



(छाया : पांडुरंग पाटील)

यावेळी वैद्
मुश्रीफ, खासदा
आमदार सतेज
आसगावकर,
पाटील, जिल्हा
शिवाजी विद्य
डी. टी. शिर्के
के. मंजूलक्ष
अधिकारी का
पोलीस अधीक्ष
ज्येष्ठ इतिहास
इंद्रजित साव
उपस्थित होते

वैद्यकीय
म्हणाले, रय
रिकामी करण
असलेल्या श

महावीर महाविद्यालय येथे व्याख

## कार्यातून सामाजिक सम

उचगाव : राजर्षी शाहू म
तर ते एक दूरदृष्टी असणारे
समाजपरिवर्तनाचा आशय दडल
शिक्षण व स्वातंत्र्य यांचा खरा
डॉ. नंदकुमार मोरे यांनी केले.
सांस्कृतिक विभाग आयोजित
विषयावर बोलत होते. अध्यक्ष
पाटील होते. डॉ. महादेव शिंदे
व प्रास्ताविक सांस्कृतिक विभा
केले. पाहुण्यांचा परिचय मराठी
करून दिला. आभार हिंदी वि
मानले. कार्यक्रम यशस्वी करण
उमेश वांगदरे, कॅप्टन डॉ. सुज
सूत्रसंचालन डॉ. अंकुश गोंड



27 JUN 2025
तरुण भारत
जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहूंच्या माणुसकीच्या विचारांचे अनुकरण करावे

## पद्मश्री जब्बार पटेल यांचे राज्यकर्ते आणि अधिकाऱ्यांना आवाहन : शाहू पुरस्काराचे मान्यवरांच्या उपस्थितीत वितरण

प्रतिनिधी
कोल्हापूर

राजर्षी शाहू महाराज यांनी जाती-जातीच्या पलीकडे जाऊन सामजिक काम केले आहे त्यांनी राजकीय जीवनात माणुसकीला प्राधान्य दिले. यामुळेच रयतेचे राजे म्हणून त्यांची ओळख निर्माण झाली. आजच्या राज्यकर्ते आणि अधिकाऱ्यांनी त्यांच्याप्रमाणे माणुसकीचे विचार अनुकरण करावे असे आवाहन ज्येष्ठ चित्रपट दिग्दर्शक, पद्मश्री डॉ. जब्बार पटेल यांनी केले.

राजर्षी शाहू छत्रपती मेमोरियल ट्रस्टचा यंदाचा मानाचा शाहू पुरस्कार गुरूवारी खासदार शाहू छत्रपती, पालकमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते डॉ. जब्बार पटेल यांना देण्यात आला. दसरा चौकातील शाहू स्मारक भवन हॉलमध्ये हा कार्यक्रम झाला. यावेळी ते बोलत होते.

डॉ. जब्बार पटेल म्हणाले, आजपर्यंत अनेक पुरस्कार मिळाले. परंतू शाहू पुरस्कार हा माझ्यासाठी वेगळा पुरस्कार आहे. राजर्षी शाहू महाराज हे सर्वांना समजून घेणारे, लोकशाही जपणारे राजे होते. त्यांनी केलेल्या कामाची खुणा आजही कोल्हापुरात आल्यावर दिसून येतात. शाहूंच्या विचारावरच संविधनाचा आराखडा आहे. त्यांनी दिलेला समतेचा विचार आजही प्रभावी ठरत आहे. समाजा -समाजातील दरी दूर करण्याचे काम त्यांनी केले. गंगाराम कांबळे यांच्या स्टॉलवर जाऊन स्वतः चहा घेतला. यामुळेच इतरांनाही त्यांचे अनुकरण केले. त्यांनी सर्व धर्मांचा, भाषेसह लोककला, संस्कृतमुल्यांचा मान ठेवला.

आतापर्यंत राज्यासह देशात राज्यकर्ते येऊन गेले त्यांनी ही मुल्य जपली आहेत. संस्थानकाळात विरोध असतानाही ५० टक्के आरक्षण दिले. त्यांनी परदेशात घेतलेल्या शिक्षणाचा फायदा येथे केला. त्यांचे तत्वज्ञान पाश्चात आणि भारतीय असा सुरेल संगमाचा मेळ घालणारे होते. त्यांनी वसतिगृह उभारली. रेल्वे सेवा आणली, आरोग्य सेवा सुरू केली. बालविवाह थांबवून महिलांना त्यांचे हक्क दिले. असा हा उमदा मनाचा राजाचे विचार आजच्या राजकर्त्यांनी आत्मसात करण्याची गरज आहे. त्यांचे नावे मिळाला हा पुरस्कार नक्कीच माझ्यासाठी प्रेरणा देणार आहे.

समाजाला दिशा देणारे सिनेमे काढणे सोपे आहे. परंतु ते शाहूंप्रमाणे व्यवहारात आणणे फार अवघड आहे. त्यांचे कला, क्रीडा क्षेत्रात मोठे योगदान आहे. नामवंत कलाकारांना कोल्हापुरात आणले. येथील कलाकारांना घडविले. गुन्हेगारांमध्ये अनुलाग्र बदल करत त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले. आपल्याकडे अनेक देवदेवतांच्या दंतकथा आहेत. राजर्षी शाहू हे माणुसकी जपत देवतांच्या पलीकडे जगले.



कोल्हापूर : पद्मश्री जब्बार पटेल यांना राजर्षी शाहू पुरस्काराने सन्मानित करताना खासदार शाहू छत्रपती, पालकमंत्री प्रकाश आबिटकर, सोबत डॉ. अशोक चौसाळकर, कार्तिकियन एस., योगेशकुमार गुप्ता, अमोल येडगे, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. जयसिंग पवार, मोहिनी चव्हाण आदी.

### विनोद शैलीतून नेते, अधिकाऱ्यांवर टोलेबाजी

राजर्षी शाहू महाराज यांच्या कार्याची माहिती त्यांनी सांगितली. आरक्षणाचा विषय ब्रिटीश राजवटीतील अधिकारी लांबवत होते. तो त्यांनी कशा प्रकारे मार्गी लावला हेही सांगितले. ते म्हणाले, आरक्षणावर निर्णय होत नसल्याने संबंधित अधिकाऱ्यालाच चहा पिण्यासाठी घरी बोलवले. पाळलेला वाघाचे लहान पिल्ले पाहून त्यांनी कशा प्रकारे आरक्षणावर सही केली हे पटेल यांनी गमतीशीरपणे सांगितले. दुसरीकडे सभागृहात असणाऱ्या अधिकारी, नेत्यांना उद्देशून त्यांनी लोकांकडे अशा वाघाचे पिल्लू आहे, हे जाणले पाहिजे. गोरगरीबांना कामासाठी फेऱ्या माराव्या लागू नये. तसेच अधिकाऱ्यांनी मंत्रालयाच्या पातळीवर कामे होत नसल्यास वाघाचे पिल्ले घेऊन जावे. हे ही सांगायला पटेल यांनी मागेपुढे पाहिले नाही. त्यांच्या या वक्तव्याने मात्र सभागृहात हस्यकल्लोळ झाला.

### कोल्हापुरातील चित्रीकरणावेळच्या म्हादबाच्या किस्सा

आपल्या पहिल्या चित्रपटाचे चित्रीकरण कोल्हापुरात केल्याचे जब्बार पटेल यांनी सांगत कोल्हापुरातील आठवणींना उजाळा दिला. कोल्हापूरकरांची बोलण्याची शैलीचेही कौतुक केले. कोल्हापुरातील तंत्रज्ञ असलेल्या म्हादबाने दिलेले पान आणि मला आधुनिकतेनुसार सुरू केलेले काम पुढेही कायम ठेवण्याची दिलेल्या सल्ला त्यांनी आवर्जुन सांगितला.

### कोल्हापूरचे फिल्म स्कूल टिकविणे आवश्यक

कोल्हापूर हे फिल्म स्कूल आहे. भालजी पेंढारकर, चंद्रकांत मांढरे, अरूण सरनाईक या सारखे अनेक दिग्गज या मातीतून तयार झाले. हे फिल्म स्कूल येथून पुढेही जपण्याची गरज असल्याचे जब्बार पटेल यांनी सांगितले.

सकाळ

# शिवाजी विद्यापीठ


कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के आणि प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते प्रतिमापूजन झाले. इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, वसुंधरा पवार, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. रामचंद्र पवार, तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. अजित कोळेकर उपस्थित होते. यावेळी प्रांजली क्षीरसागर यांनी छत्रपती शाहू महाराज यांनी काढलेल्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या जाहीरनाम्याचे वाचन केले.

27 JUN 2025 सकाळ

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# राजर्षींच्या हृदयात करुणेचा झरा

## डॉ. जयसिंगराव पवार; 'असे होते आपले शाहू महाराज'चे प्रकाशन



कोल्हापूर : 'असे होते आपले शाहू महाराज' या चरित्रग्रंथाचे प्रकाशन करताना डॉ. जयसिंगराव पवार. डावीकडून अन्वर हुसेन, गोरख थोरात, अवनीश पाटील, डॉ. डी. टी. शिर्के, डॉ. पी. एस. पाटील, डॉ. व्ही. एन. शिंदे.

कोल्हापूर, ता. २६ : 'राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या हृदयात दीनदलितांसाठी बुद्धाप्रमाणे करुणेचा झरा आणि आईप्रमाणे ममत्वभाव ओसंडून वाहत होता. डॉ. नंदकुमार मोरे यांच्या चरित्रग्रंथाच्या माध्यमातून या करुणासागराच्या संस्कार कथा बालकुमारांपर्यंत पोहोचणार आहेत, याचा मोठा आनंद वाटतो. विद्यापीठातर्फे बालकुमारांसाठी हा चरित्रग्रंथ प्रकाशित होणे ही अभिनव घटना आहे', असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी आज येथे केले.

विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. मोरे यांनी लिहिलेल्या 'असे होते आपले शाहू महाराज' या चरित्रग्रंथासह त्याच्या इंग्रजी, हिंदी, कन्नड आणि गुजराती अनुवाद ग्रंथांचेही आज राजर्षी शाहू छत्रपती महाराज यांच्या जयंतीनिमित्त डॉ. पवार यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. इतिहास अधिविभागातर्फे आयोजित या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते.

डॉ. मोरे म्हणाले, 'शाहू महाराजांच्या या चरित्रग्रंथावर काम करताना त्यांचे अनेक पैलू सामोरे आले. बुद्धापासून ते कबीर, तुकाराम, महात्मा गांधी, विनोबा भावे या साऱ्यांची आठवण झाली. एक तत्त्वचिंतक म्हणून राजर्षी शाहू महाराज सामोरे आलेच; पण त्याचबरोबर आईचे हृदय असणारा ममताळू माणूस म्हणूनही ते भावले.'

कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, 'शाहू महाराजांचा हा चरित्रग्रंथ म्हणजे मराठी साहित्य, इतिहास आणि कला यांचा त्रिवेणी संगम आहे.' हिंदी आवृत्तीचे अनुवादक डॉ. गोरख थोरात, चित्रकार अन्वर हुसेन यांनीही मनोगत व्यक्त केले. माजी कुलगुरू प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या 'ग्लिम्प्सेस ऑफ राजर्षी शाहू महाराज' या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद डॉ. धनंजय देवळालकर यांनी केला. त्यांच्या 'शाहू महाराजांचे दर्शन' या अनुवाद ग्रंथाचे प्रकाशन करण्यात आले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
27 JUN 2025
लोकमत

# शाहू महाराजांच्या हृदयात दीनदलितांसाठी करुणेचा झरा : डॉ. जयसिंगराव पवार

## 'असे होते आपले शाहू महाराज'च्या मराठीसह पाच भाषांतील आवृत्ती प्रकाशित

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या हृदयात दीनदलितांसाठी बुद्धाप्रमाणे करुणेचा झरा आणि आईप्रमाणे ममत्वभाव ओसंडून वाहत होता. डॉ. नंदकुमार मोरे यांच्या चरित्रग्रंथाच्या माध्यमातून या करुणासागराच्या संस्कारकथा बालकुमारांपर्यंत पोहोचणार आहेत, याचा मोठा आनंद वाटतो, असे उद्‌गार ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी गुरुवारी येथे काढले.

विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे यांनी लिहिलेल्या 'असे होते आपले शाहू महाराज' या चरित्रग्रंथासह त्याच्या इंग्रजी, हिंदी, कन्नड आणि गुजराती अनुवाद ग्रंथांचे शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त इतिहास विभागातर्फे डॉ. पवार यांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के अध्यक्षस्थानी होते. प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील प्रमुख उपस्थित होते. डॉ. अवनीश पाटील यांनी प्रास्ताविक केले. प्रांजली क्षीरसागर यांनी सूत्रसंचालन केले.



शिवाजी विद्यापीठात डॉ. नंदकुमार मोरे लिखित 'असे होते आपले शाहू महाराज' या चरित्रग्रंथाचे प्रकाशन डॉ. जयसिंगराव पवार यांनी केले. यावेळी अन्वर हुसेन, डॉ. गोरख थोरात, डॉ. अवनीश पाटील, डॉ. नंदकुमार मोरे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे उपस्थित होते.

### अनुवादग्रंथाचेही प्रकाशन

माजी कुलगुरू प्राचार्य दिवंगत रा. कृ. कणबरकर यांच्या 'ग्लिम्प्सेस ऑफ राजर्षी शाहू महाराज' या इंग्रजी पुस्तकाचा मराठी अनुवाद डॉ. धनंजय देवळालकर यांनी केला. त्यांच्या 'शाहू महाराजांचे दर्शन' या अनुवादग्रंथाचे प्रकाशनही डॉ. पवार यांनी केले.

2 7 JUN 2025 पुढारी जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहू महाराजांच्या हृदयात दीनदलितांसाठी करुणेचा झरा

## डॉ. जयसिंगराव पवार; 'असे होते आपले शाहू महाराज' या चरित्रग्रंथाच्या मराठीसह पाच भाषांतील आवृत्ती प्रकाशित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राजर्षी शाहू महाराज यांच्या हृदयात दीनदलितांसाठी बुद्धाप्रमाणे करुणेचा झरा व आईप्रमाणे ममत्वभाव ओसंडून वाहत होता. राजर्षी शाहू यांच्या चरित्रग्रंथाच्या माध्यमातून करुणासागराच्या संस्कारकथा बालकुमारांपर्यंत पोहोचणार आहेत, याचा आनंद वाटतो, असे उद्‌गार ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी काढले.

विद्यापीठाच्या मराठी अधिविभागाचे प्रमुख डॉ. नंदकुमार मोरे लिखित 'असे होते आपले शाहू महाराज' या चरित्रग्रंथासह त्यांच्या इंग्रजी, हिंदी, कन्नड आणि गुजराती अनुवाद ग्रंथांचे राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त डॉ. पवार यांच्या हस्ते प्रकाशन झाले. यावेळी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील प्रमुख उपस्थित होते. दरम्यान, माजी कुलगुरू प्राचार्य रा. कृ. कणबरकर यांच्या 'शाहू महाराजांचे दर्शन' या अनुवाद ग्रंथाचे प्रकाशन झाले.



कोल्हापूर : डॉ. नंदकुमार मोरे लिखित 'असे होते आपले शाहू महाराज' या चरित्रग्रंथाच्या प्रकाशन समारंभात बोलताना डॉ. जयसिंगराव पवार. समवेत डॉ. अवनीश पाटील, डॉ. नंदकुमार मोरे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे. (छाया : मिलन मकानदार)

### प्रकाशनादिवशीच पुस्तकाच्या हजार प्रतींची विक्री

'असे होते आपले शाहू महाराज' या ग्रंथाच्या सुमारे एक हजार प्रतींची प्रकाशनाच्या दिवशी विक्री झाली. विद्यापीठाने या पहिल्या आवृत्तीची किंमत प्रत्येक समाजघटकाला परवडेल अशी म्हणजे अवघी ५० रुपये ठेवली आहे. त्यामुळे शाहू जयंतीचे औचित्य साधून गुरुवारी दिवसभरात अनेक शाहूप्रेमींनी पुस्तकाची खरेदी केली.

27 JUN 2025 तरुण भारत जनसंपर्क कक्ष शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# बहुजन समाजाने कृतज्ञ असावे

## इतिहास संशोधक डॉ. इंद्रजीत सावंत : विद्यापीठात शाहू जयंती



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राजर्षी शाहू जयंतीनिमित्त मार्गदर्शन करताना डॉ. इंद्रजीत सावंत. सोबत शुभम शिरहट्टी, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, खासदार श्रीमंत शाहू छत्रपती, प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील.




**प्रतिनिधी**
कोल्हापूर

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारकार्यामुळेच या देशातील दलित, बहुजनांच्या अस्तित्वाला अर्थ प्राप्त झाला. त्याबद्दल आपण त्यांच्याप्रती कृतज्ञ असायला हवे, असे प्रतिपादन इतिहास संशोधक डॉ. इंद्रजीत सावंत यांनी केले.

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या १५१ जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठ आणि शाहू सेना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित परिषदेत ते बोलत होते. 'वदले शाहू छत्रपती' हा त्यांच्या व्याख्यानाचा विषय होता.

राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या कार्यक्रमात खासदार श्रीमंत शाहू छत्रपती यांची प्रमुख उपस्थित होती. तर अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के होते. खासदार श्रीमंत शाहू छत्रपती यांच्या हस्ते परिषदेचे उद्घाटन करण्यात आले.

डॉ. सावंत म्हणाले, छत्रपती शाहू महाराज हे छत्रपती शिवाजी महाराज यांचे वारसदार होते. या दोघांच्या जीवनकार्यात, उद्दिष्टांत बहुतांश साम्य आहे. विस्मरणात गेलेल्या शिवराज्याभिषेक शकाचे पुनरुज्जीवन करण्याचे महत्त्वाचे कार्यही त्यांनी केले. महाराष्ट्रात शिक्षणाचा पाया महात्मा फुले यांनी घातला आणि तो महाराष्ट्रभर विस्तारण्याचे शाहू महाराज यांनी केले.

अध्यक्षस्थानावरून कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, शाहू महाराज यांनी शैक्षणिक क्षेत्रासाठी केलेले कार्य खूप मोठे आहे. पी. सी. पाटील यांच्यापासून ते कर्मवीर भाऊराव पाटील यांच्यापर्यंत महाराष्ट्र घडविणारी आणि सर्वदूर प्रभाव टाकणारी मंडळी त्यांनी तयार केली.ए शाहू सेनेचे अध्यक्ष शुभम शिरहट्टी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले. यावेळी प्र–कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील, कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे आदी उपस्थित होते.

27 JUN 2025

पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# शाहू विचारांमुळेच बहुजनांना अस्तित्वाचा अर्थ

## इंद्रजीत सावंत : शिवाजी विद्यापीठात 'वदले शाहू छत्रपती' विषयावर व्याख्यान

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या विचारसंपत्तीमुळेच देशातील दलित, बहुजन समाजाला अस्तित्वाचा अर्थ मिळाला. त्यामुळे शाहू महाराजांच्या सामाजिक कार्याबद्दल आपण कृतज्ञ असले पाहिजे, असे प्रतिपादन इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांनी केले.

शाहू महाराजांच्या १५१ व्या जयंतीच्या पूर्वसंध्येला शिवाजी विद्यापीठ आणि शाहू सेना यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित शाहू समता परिषदेच्या व्यासपीठावरून 'वदले शाहू छत्रपती' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या परिषदेस खासदार शाहू महाराज प्रमुख उपस्थित होते. अध्यक्षस्थानी कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के होते. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील व कुलसचिव डॉ. विलास शिंदे उपस्थित होते.

सावंत यांनी शाहू महाराजांचे पत्रव्यवहार, भाषणांतून उमटणाऱ्या त्यांच्या न्यायनीतीवर प्रकाश टाकत, छ. शिवाजी महाराजांच्या आज्ञापत्रांशी त्यांची तुलना केली. महाराजांनी विस्मरणात गेलेल्या शिवराज्याभिषेक शकाचे पुनरुज्जीवन केले, शिक्षण प्रसार, जातिभेद निर्मूलन आणि सैन्यात बहुजन युवकांना संधी मिळावी यासाठी प्रयत्न केले, असे त्यांनी नमूद केले. शिवाजी विद्यापीठाने शाहू महाराजांच्या दस्तावेजांचे महत्त्वपूर्ण दस्तावेजीकरण केले असून, इतिहास लोकांपर्यंत पोहोचवण्याचे मोठे कार्य केल्याचे त्यांनी अधोरेखित केले.



**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात राजर्षी शाहू जयंतीनिमित्त 'वदले शाहू छत्रपती' या विषयावर बोलताना इतिहास अभ्यासक इंद्रजित सावंत. (छाया : मिलन मकानदार)**

खा. शाहू महाराज म्हणाले, आजच्या युगात समतेच्या लढ्याला नव्या परिभाषेची गरज आहे आणि ती परिभाषा विद्यार्थ्यांच्या कृतीतून घडेल.

डॉ. शिर्के म्हणाले, विद्यापीठाच्या प्रत्येक अभ्यासक्रम व धोरणात राजर्षी शाहू महाराजांचा विचार समाविष्ट केला जाईल. खासदार शाहू महाराज यांच्या हस्ते रोपाला पाणी घालून या परिषदेचे उद्घाटन झाले. शुभम शिरहट्टी यांनी प्रास्ताविक केले. डॉ. तानाजी चौगुले यांनी आभार मानले.

पुढारी

## शिवाजी विद्यापीठ

राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त शिवाजी विद्यापीठात त्यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. डी. टी शिर्के व प्र-कुलगुरू डॉ. पी. एस. पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, वसुंधरा पवार यांच्यासह कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, डॉ. रामचंद्र पवार, तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. अजित कोळेकर उपस्थित होते. याप्रसंगी प्रांजली क्षीरसागर यांनी शाहू महाराज यांनी काढलेल्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या जाहीरनाम्याचे वाचन केले.

27 JUN 2026 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# प्राध्यापकांनी दर्जेदार ई-कंटेन्ट निर्मिती करण्याकडेही लक्ष द्यावे

## कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के; बी. ए. भाग-२ साठी इतिहासाची पुस्तके प्रकाशित

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाने ज्या गतीने क्रमिक पुस्तकांची निर्मिती केली, त्याच पद्धतीने आता दर्जेदार ई-कंटेन्ट निर्मिती करण्यासाठीही प्रयत्न करावेत, असे आवाहन कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के यांनी केले.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात बी. ए. भाग-२ च्या इतिहासाची पुस्तके व स्वयंअध्ययन साहित्याचे प्रकाशन करताना कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के. सोबत कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, डॉ. चंद्रवदन नाईक, डॉ. महादेव देशमुख, डॉ. अवनीश पाटील आदी. (छाया : [illegible])

शिवाजी विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाच्या वतीने बी.ए. - भाग २ साठी तयार करण्यात आलेल्या सहा क्रमिक पुस्तके व तीन स्वयंअध्ययन साहित्य पुस्तकांचे कुलगुरू डॉ. शिर्के यांच्या हस्ते प्रकाशन झाले, यावेळी ते बोलत होते. कुलगुरू डॉ. शिर्के म्हणाले, अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. चंद्रवदन नाईक यांनी केलेल्या आवाहनाला इतिहासाच्या शिक्षकांनी उत्तम प्रतिसाद दिल्यामुळेच प्रवेश प्रक्रिया सुरू असतानाच क्रमिक पुस्तके विद्यार्थ्यांना उपलब्ध करून देणे शक्य झाले आहे. यावेळी कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे, मानव्यविज्ञान विद्याशाखेचे अधिष्ठाता डॉ. महादेव देशमुख, इतिहास अभ्यास मंडळाचे अध्यक्ष डॉ. चंद्रवदन नाईक, इतिहास अधिविभाग प्रमुख डॉ. अवनीश पाटील, दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्राचे संचालक डॉ. कृष्णा पाटील, अभ्यास मंडळे विभागाच्या प्रभारी उपकुलसचिव विभा अंत्रेडी, डॉ. कविता गगराणी उपस्थित होते.

तरुण भारत

# दूरशिक्षण ऑनलाईन एमबीएसाठी १३ जुलैला फेर प्रवेश परीक्षा

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील दूरशिक्षण आणि ऑनलाईन शिक्षण केंद्रामार्फत शैक्षणिक वर्ष २०२५-२६ च्या एम.बी.ए. (डिस्टन्स मोड) या अभ्यासक्रमासाठी रिक्त जागांसाठी फेर प्रवेश परीक्षा घेण्यात येणार आहे. परीक्षेसाठी ७ जुलैपर्यंत **httpsё//sukapps.unishivaji.ac.in/pgentrance/#/login** या लिंकवर अर्ज भरावयाचा आहे. ही परीक्षा रविवार १३ जुलै रोजी दूरशिक्षण व ऑनलाईन शिक्षण केंद्रामध्ये होणार आहे. तसेच ज्यांनी **MHTöCET /ATMA CET** दिली असेल त्यांना एम.बी.ए. (डिस्टन्स) साठी थेट प्रवेश घेता येईल, अशी माहिती डॉ. के. बी. पाटील यांनी प्रसिध्द केली आहे.

पुण्यनगरी

# विद्यापीठात शाहू महाराजांना अभिवादन

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठामध्ये राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांची जयंती साजरी करण्यात आली. सकाळी राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या प्रतिमेस कुलगुरू डॉ. दिगंबर शिर्के, प्र-कुलगुरू डॉ. प्रमोद पाटील यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करण्यात आला. यावेळी ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार, वसुंधरा पवार, कुलसचिव डॉ. विलास शिंदे, परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, वित्त व लेखाधिकारी डॉ. सुहासिनी जाधव, अधिष्ठाता डॉ. श्रीकृष्ण महाजन, डॉ. महादेव देशमुख, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. तानाजी चौगुले, क्रीडा संचालक डॉ. शरद बनसोडे, आजीवन अध्ययन केंद्र संचालक डॉ. रामचंद्र पवार, तंत्रज्ञान अधिविभाग संचालक डॉ. अजित कोळेकर आदी उपस्थित होते. प्रांजली क्षीरसागर यांनी छत्रपती शाहू महाराज यांनी काढलेल्या सक्तीच्या प्राथमिक शिक्षणाच्या जाहीरनाम्याचे वाचन केले.